विद्याविकास

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## विद्यार्थी विकास मंडळ

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

**डॉ. सविता कुलकर्णी**

**संचालक** (अतिरिक्त कार्यभार)

संदर्भ क्र. विविमं/२०२६–२७/८० दिनांक : १०/०७/२०२६

प्रति,

**मा. प्राचार्य/मा. संचालक/मा. विभागप्रमुख,**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित

सर्व महाविद्यालये व परिसंस्था,

विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग.

विषय:– 'YOUVAN' युवा अभियान राबविण्याबाबत...

महोदय/महोदया,

आजचा युवा वर्ग हा केवळ उद्याचा नागरिक नसून आजच्या समाजपरिवर्तनाचा सक्रिय घटक आहे. युवकांची ऊर्जा, सर्जनशीलता, सामाजिक जाणीव आणि कृतीक्षमतेचा योग्य दिशेने उपयोग झाला, तर देशासमोरील अनेक आव्हानांवर प्रभावी उपाय निर्माण होऊ शकतात. या भावनेतून 'YOUVAN' या युवा अभियानाचे संकल्पना साकारण्यात आले आहे.

'YOUVAN' (Youth Organized and United for Nation-building) ही केवळ चर्चेची किंवा विचारमंथनाची मोहिम नसून, ''फक्त चर्चा नाही, आता कृती'' या विचारावर आधारीत युवकांना समाजाने देशासाठी प्रत्यक्ष कृती करण्याची संधी देणारी चळवळ आहे. या 'YOUVAN' अभियानाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे–

१. युवकांमध्ये सामाजिक उत्तरदायित्वाची भावना विकसित करणे.
२. युवकांना समाजोपयोगी कार्यामध्ये प्रत्यक्ष सहभागी करून घेणे.
३. स्थानिक समस्या व स्थानिक पातळीवर कृतीशील उपाय शोधण्यास प्रोत्साहन देणे.
४. नेतृत्त्वगुण, संघभावना आणि स्वयंप्रेरणेचा विकास करणे.
५. सकारात्मक कृतीद्वारे देशाच्या विकासामध्ये युवकांचे योगदान वाढविणे.
६. ''मी बदल घडवू शकतो'' हा आत्मविश्वास युवकांमध्ये निर्माण करणे.

तरी आपल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, विद्यार्थी कल्याणी अधिकारी, संबंधित शैक्षणिक विभाग यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना सहभागी होण्याबाबत प्रोत्साहित करावे. सदर उपक्रम महाविद्यालयातील सर्व घटकांच्या सामुहिक सहभागातून यशस्वी करण्याबाबत आपण आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करवी. कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे

(डॉ. सविता कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)


**कृष्णा रघुनाथ भंडलकर**
सदस्य : अधिसभा
भ्रमणध्वनी : ९५६१३८३८३८
ई-मेल : BkrushnasenateSppU6123@gmail.com

**Krushna Raghunath Bhandalkar**
Member : Senate
Mob. No. : 9561383838
Mail ID : BkrushnasenateSppU6123@gmail.com


आवक क्र. 52
22 JUN 2026
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

मा. कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक दिनांक 17 JUN 2026
आवक क्रमांक व्हीसी 3388
जावक दिनांक 18 JUN 2026

मा. प्र-कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
18 JUN 2026
आवक क्रमांक:पीव्हीसी/ 1446
जावक दिनांक: 19-6-26
विभाग: D/BSD

दिनांक :- १६/०६/२०२६

प्रति,
मा. कुलगुरू महोदय,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे – ४११००७

**विषय :- विद्यापीठ सर्व विभाग व संलग्न महाविद्यालयात "YOUVAN" अभियान राबवण्याबाबत...**

मा. महोदय,

दिनांक ०१ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत सर्व युवकांमध्ये देशप्रेम व समाजाप्रती बांधिलकी निर्माण करण्याच्या उद्देशाने प्रवाह फाउंडेशनतर्फे "YOUVAN" अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानामध्ये आपल्या विद्यापीठाने तसेच संलग्न महाविद्यालयांनी सक्रिय सहभाग नोंदवून विद्यार्थ्यांना या उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे, ही नम्र विनंती.

आपल्या सहकार्यामुळे युवकांमध्ये राष्ट्रभक्तीची भावना दृढ होण्यास निश्चितच मदत होईल.

आपला,

(कृष्णा भंडलकर)

Dir. BSD

सोबत :-
१. प्रवाह फाउंडेशनचे पत्र
२. "YOUVAN" चे माहिती पत्रक (पोस्टर)


निवास : निर्झर निवास, लेन नं. ३, मधुबन सोसयटी, शितोळे नगर, सांगवी पुणे-४११०२७
**Resi. :** Nirzar Niwas, Lane- 3, Madhuban Society, Shitole Nagar, Sangvi, Pune-411027

PRAVAH
# PRAVAH FOUNDATION

pravaheducations@gmail.com | +91 7776862167

प्रति,
मा. कुलगुरू महोदय,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

विषय : "YOUVAN" युवा अभियानाच्या परिचय व विद्यार्थी सहभागासाठी विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयांमध्ये कार्यक्रम आयोजित करण्याबाबत विनंती.

महोदय,

सप्रेम नमस्कार.
आजचा युवा वर्ग हा केवळ उद्याचा नागरिक नसून आजच्या समाजपरिवर्तनाचा सक्रिय घटक आहे. युवकांची ऊर्जा, सर्जनशीलता, सामाजिक जाणीव आणि कृतीक्षमतेचा योग्य दिशेने उपयोग झाला, तर देशासमोरील अनेक आव्हानांवर प्रभावी उपाय निर्माण होऊ शकतात. या भावनेतून "YOUVAN" या युवा अभियानाची संकल्पना साकारण्यात आली आहे.

YOUVAN (Youth Organized & United for Nation-building) ही केवळ चर्चेची किंवा विचारमंथनाची मोहीम नसून, "फक्त चर्चा नाही, आता कृती" या विचारावर आधारित युवकांना समाज आणि देशासाठी प्रत्यक्ष कृती करण्याची संधी देणारी चळवळ आहे. पर्यावरण संवर्धन, शैक्षणिक उपक्रम, आरोग्य जनजागृती, ग्रामविकास, कृषी, पशुधन संवर्धन, सामाजिक समरसता, कौशल्य विकास, नवकल्पना आणि स्थानिक समस्या निराकरण अशा विविध क्षेत्रांमध्ये युवकांनी स्वतःच्या आवडीप्रमाणे आणि क्षमतेनुसार योगदान द्यावे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

या अभियानामध्ये युवकांना स्वतःच्या आवडीनुसार, वेळेनुसार आणि क्षमतेनुसार सकारात्मक कृतीमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. एखादा विद्यार्थी एकट्याने वृक्षारोपण करू शकतो, मित्रांसह स्वच्छता अभियान राबवू शकतो, गावातील विद्यार्थ्यांसाठी अध्ययन सहाय्य उपक्रम घेऊ शकतो, आरोग्य विषयक जनजागृती करू शकतो किंवा आपल्या परिसरातील एखाद्या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी पुढाकार घेऊ शकतो. अशा प्रत्येक सकारात्मक कृतीतून समाजामध्ये परिवर्तनाची नवी सुरुवात घडू शकते.

- PRAVAH FOUNDATION
- 1002, UNNATI DHAM, NEAR SHATRUNJAY JAIN MANDIR, KATRAJ KONDHWA ROAD, PUNE, MAHARASHTRA-411048

YOUVAN अभियानाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत –
- युवकांमध्ये सामाजिक उत्तरदायित्वाची भावना विकसित करणे.
- युवकांना समाजोपयोगी कार्यामध्ये प्रत्यक्ष सहभागी करून घेणे.
- स्थानिक समस्यांवर स्थानिक पातळीवर कृतीशील उपाय शोधण्यास प्रोत्साहन देणे.
- नेतृत्वगुण, संघभावना आणि स्वयंप्रेरणेचा विकास करणे.
- सकारात्मक कृतीद्वारे देशाच्या विकासामध्ये युवकांचे योगदान वाढविणे.
- "मी बदल घडवू शकतो" हा आत्मविश्वास युवकांमध्ये निर्माण करणे.

आपल्या विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक उत्तरदायित्वाची भावना विकसित होऊन त्यांना सकारात्मक कृतीसाठी प्रेरित करण्याच्या दृष्टीने विद्यापीठ स्तरावर YOUVAN अभियान परिचय व प्रेरणा कार्यक्रम आयोजित करण्यात यावा, अशी नम्र विनंती आहे.

या कार्यक्रमामध्ये पुढील बाबींचा समावेश करता येईल –
१. YOUVAN अभियानाची संकल्पना, उद्दिष्टे व कार्यपद्धती.
२. युवकांच्या सहभागासाठी उपलब्ध विविध क्षेत्रांची माहिती.
३. विद्यार्थ्यांच्या नेतृत्व विकासामध्ये स्वयंप्रेरित उपक्रमांचे महत्त्व.
४. समाज आणि देशाच्या विकासामध्ये युवा शक्तीची भूमिका.
५. विद्यापीठ, महाविद्यालये आणि विद्यार्थ्यांच्या सहभागातून कृती आराखडा निश्चित करणे.
६. अभियानांतर्गत राबविता येणाऱ्या उपक्रमांची उदाहरणे व अनुभव कथन.

आपण या अभियानास सकारात्मक प्रतिसाद देऊन विद्यापीठ स्तरावर कार्यक्रम आयोजित करण्यासाठी आवश्यक सहकार्य करावे, तसेच कार्यक्रमासाठी आपल्या सोयीप्रमाणे दिनांक व वेळ निश्चित करून कळवावे, ही नम्र विनंती.
या अभियानाच्या माध्यमातून युवकांच्या सकारात्मक सहभागाला चालना मिळून समाज आणि देशाच्या विकासामध्ये त्यांचे योगदान वाढण्यास मदत होईल, असा आम्हाला विश्वास आहे. युवकांच्या कृतीशील सहभागातून सकारात्मक परिवर्तन घडविण्याच्या या प्रयत्नात आपल्या विद्यापीठाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभेल, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

धन्यवाद.

आपला विश्वासू,
शंतनु लामधाडे

Youvan
Youth for Bharat
Youth Organized and United with vision and action for nation building

in association with PRAVAH

# Youth Organized & United for Nation Building

## फक्त चर्चा नाही, आता कृती!

चला, युवा जोडूया; देश घडवूया.

YOUVAN ही युवकांना समाज आणि देशासाठी प्रत्यक्ष काहीतरी करण्याची संधी देणारी मोहीम आहे. १ ते १८ ऑगस्ट २०२६ दरम्यान आपल्या आवडीच्या कोणत्याही क्षेत्रात, आपल्या पद्धतीने आणि आपल्या वेळेनुसार, एकट्याने किंवा मित्रांसोबत सकारात्मक बदलाचा भाग व्हा. प्रत्येक सकारात्मक कृती ही बदलाची नवी सुरुवात ठरु शकते. कारण देश घडतो तो तरुणांच्या विचारांनी आणि कृतींनी.

## आपल्या आवडीचे क्षेत्र

पर्यावरण · शिक्षण · आरोग्य · कृषी · ग्रामविकास · सहकार

क्रीडा · इतिहास संशोधन · पशुसंवर्धन · समाज विकास · स्वावलंबी भारत · सद्भाव

## वयोगट 16 ते 25 – विद्यार्थी व सर्व प्राध्यापक

**आजच सहभागी व्हा!**
Google Form / QR Code द्वारे नोंदणी करा.
contact.youvan@gmail.com

/youvan
www.pravahfoundation.org